अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# क्रांतीची शब्दमशाल पेटवणारा कवी

मराठी साहित्यामध्ये एका क्रांतीची शब्दमशाल आणणारा कवी म्हणून नामदेव ढसाळ यांचे स्थान कायम राहील. समाजामध्ये आपल्या भावभावनांना समजसपणा प्राप्त करून द्यायचा असेल तर शब्दांचाच आधार घ्यावा लागतो. नामदेव ढसाळ हे अशा एका वातावरणातून पुढे आले की, त्यांनी आपल्या शब्दांच्या माध्यमातून समाजातला समंजसपणा वाढवण्याचा प्रयत्न केला. काळाच्या कातळावर अक्षरे कोरणारा, काळजाचा थरकाप उडवणारा असा हा कसलेला कवी होता यात काही शंका नाही. कवी म्हणजे केवळ काव्यप्रांतात रमणारा आणि आपल्याच स्वानंदामध्ये स्वान्त सुखाचा अनुभव घेणारा माणूस असे बऱ्याच वेळेला समजले जाते. परंतु, स्वत:मधल्या संवेदनांना खऱ्या अर्थाने जो साक्षर करतो आणि निरक्षर सभ्यतेला जो खऱ्या अर्थाने आकार देतो तोच खरा कवी म्हटला पाहिजे आणि तोच समाजाचा देखील प्रवक्ता म्हटला पाहिजे. नामदेव ढसाळ हा असाच एक समाजाचा प्रवक्ता आणि कवी होता. मुंबईसारख्या रेडलाईट एरियाच्या आयुष्याचे चित्रण करून सभ्य समाजाच्या तथाकथित सभ्यपणाला तडाखे देण्याचे काम ढसाळांनी केले. मग तो गोलपीठा असेल किंवा गांडू बगीचासारखी पुस्तके असतील. त्यांनी आपल्या सगळ्या संवेदनांना कोणतीही भीडभाड न ठेवता किंवा आडपडदा न ठेवता थेट व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आणि खरोखरच डोळ्यामध्ये अंगार घेऊन अन्यायाविरुध्द समोरच्याच्या अंगावर धावणारा हा खराखुरा पँथर होता. खरे तर साहित्याच्या वाटेने जाताना त्यांना दलित पँथर स्थापन करण्याची काहीच गरज नव्हती. परंतु सभ्यतेच्या सुखासाठी सोकावलेल्या मराठी साहित्य विश्वाला त्यांना दोन शब्द सांगायचे होते. माणुसकीचा गहिवर हा केवळ शब्दांनी व्यक्त होऊ शकत नाही. तर त्यासाठी एका आंदोलनाचीदेखील गरज भासते. ते आंदोलन कसे असावे, काय असावे हा भाग नंतरचा ठरतो. मला जे वाटते ते मी शब्दातून व्यक्त करतो, असे म्हणत असताना शब्दांतून व्यक्त झालेले मी एक-दोन टक्क्याने साकार करू शकतो का? हा विचार तितकाच महत्त्वाचा ठरू शकतो. काळाच्या कसोटीवर शब्दकृतीतून साकार करणे हे तितकेसे सोपे नाही. म्हणूनच केवळ सभासंमेलनांच्या व्यासपीठावर टाळ्या मिळवून काम भागणार नाही. विचारांचे क्षितिज विस्तारायचे असेल तर चोचीमध्ये शब्द पकडून विहार करणाऱ्यांच्या पंखामध्ये बळ निर्माण करावे लागते. अशा मळकट आयुष्याला बळकट करणारा मुक्त स्वभावाचा पण सशक्त विचारांचा हा एक नामदेव होता यात काही शंका नाही.

## काळाच्या कातळावर शब्द कोरणारा

नामदेव ढसाळांच्या साहित्याची सूची एवढी मोठी आहे की, त्यांनी समाजातल्या अनेक धुरिणांना तुझी इयत्ता कंची? असा प्रश्न विचारला होता. मग गोलपिठा असेल नाहीतर अगदी परदेशातल्या लेडी मॅकबेथ व अँचिलससारखे संदर्भ देऊन मार्क्सवादी विचारांचा अनुभवनिष्ठ पुरावा ते आपल्या साहित्यातून देत असत. बाबासाहेब आंबेडकरांचा हा सच्चा अनुयायी होता हे सांगण्याची गरज उरत नाही. कारण बाबासाहेबांनी ज्या समाजकारणाचा पाया घातला. ज्यामध्ये स्वातंत्र्य समता आणि बंधुता याची मांडणी केली गेली. परंतु, हे मिळवायचे असेल तर संघटनेशिवाय पर्याय नाही. यासाठीच दलित पँथरची निर्मिती केली गेली. म्हणूनच मनामध्ये दबून बसलेल्या विचारांना एका वेगळ्या क्रांतीची शब्दमशाल ढसाळांच्या रूपाने लाभली, असे पुन्हा पुन्हा सांगावेसे वाटते. ब्राह्मणापेक्षा ब्राह्मण्यावर कडाडून हल्ला चढवणारा आपल्याच कंपूमध्ये राहून जातिभेद आणि धर्मांच्या भिंती नकळतपणे जोपासणाऱ्यांचा त्यांनी नेहमीच समाचार घेतला. पण स्वत:च्या मनामध्ये कुठेही त्या मतभेदांच्या भिंती त्यांनी राहू दिल्या नाहीत. आणि म्हणूनच पूर्णपणे हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या मुखपत्रामध्ये समष्टीचा विचार मांडून नव्या विचारांचे अभंगदर्शन त्यांनी घडवले. इतिहास जितका वाचायचा असतो तितकाच तो समजून घ्यायचा असतो. काळाच्या कसोटीवर त्याची मांडणी करून समाजाला नवा श्वास घायचा असतो, हे सांगणारे अनेक लेख नामदेव ढसाळांनी लिहिले. वेद, उपनिषदांपासून जागतिक कीर्तीच्या कविंच्या कवितांचा वेध घेण्यापर्यंत त्यांनी आपले शब्दसामर्थ्य दाखवून दिले. प्रगल्भता जितकी बुध्दी किंवा प्रज्ञेशी संबंधित असते त्यापेक्षाही ती आंतरिक जाणिवांशी नाते ठेवणारी असते. मग एखादे चित्रप्रदर्शन बघताना रंगसंगती किंवा कुंचल्याचा अर्थ शोधताना त्याच्या मानवी आयामांचे काही अर्थ गवसतात का? असा प्रयत्न करणारा हा कवी होता. कारण त्याच्यामध्ये एक तितकाच ताकदवान सामाजिक विश्लेषक दडलेला होता हे नाकारता येणार नाही. अशा या प्रज्ञावान साहित्यिकाने दिलेले विचार किंवा त्याने मांडलेली भूमिका याची इतिहासामध्ये कायमचीच नोंद होणार आहे. आतापर्यंत जे दुर्लक्षित होते त्या मानव्याचे आयाम सांगण्याचा प्रयत्न ढसाळांनी केला होता. म्हणून इतिहासालाही नवा आयाम शोधावा लागेल.

## अजूनही विसंगती कायम

दुर्दैव असे की, अनेकवेळेला प्रतिभावानांकडे प्रस्थापित लोक जाणून बुजून दुर्लक्ष करतात. अगदी प्रसार माध्यमांनीसुध्दा ढसाळांच्या या बुध्दीवैभवाचा हवा तसा गौरव केला नाही किंवा समाजाने ढसाळांचा हा विचार पाहिजे त्या प्रमाणात प्रसारितही केला नाही. थोड्या आयुष्यामध्ये अक्षरश: गाडाभर साहित्य देऊन जाणारा हा शब्दांचा यात्रिक अनंताच्या यात्रेला निघून गेला. आज एकूणच सामाजिक परिस्थितीचा विचार केला तर त्यांच्यासारख्या कृतिशिल साहित्यिकांची समाजाला गरज आहे हे जाणवल्याशिवाय राहात नाही. साधनशुचितेपेक्षा ज्याने सूर्याचे सात घोडे मारण्याचा शब्दविचार मांडला, ते तेज समजून घेतले पाहिजे. अन्यायाला आणि समाजातल्या विसंगतीला या निमित्ताने कुठेतरी मूठमाती दिली पाहिजे. गोलपीठा लिहून झाल्यानंतरही अन्यायाचा आणि वंचितांचा गोलपीठा गावोगावी आणि जागोजागी दिसून येतो. हेच आपल्या समाजाच्या विचारशून्यतेचे मोठे द्योतक ठरते. शासकच भक्षक होतात आणि समाज जेव्हा सुस्त होतो त्यावेळेला परिवर्तनाला वेग मिळूच शकत नाही, हीच आज परिस्थिती दिसून येते. नामदेव ढसाळांनी आपल्या या विचार आणि कृतीसामर्थ्यातून वेगळेपणाचा ध्यास घेतला. काही प्रमाणात त्यांचा सन्मानही झाला. अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. तरीसुध्दा सामाजिक परिस्थितीतली ही विसंगती दूर होणे अजून बाकी आहे. हाच तो ढसाळांनी सांगितलेला गांडू बगीचा होता.